# महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ

" जैवविविधता भवन " सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४०००१ ✆: ०७१२-२५२२९८२ / ८४

Website: www.maharashtrabiodiversityboard.gov.in, Email : msbb.ngp@gmail.com

सत्यमेव जयते


क्रमांक : मराजैविमं/कक्ष-३/जि.प/९४१ /२०१६-१७
नागपुर, **दिनांक** ०६/१०/२०१६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय :** जिल्हा परिषद स्तरावर तांत्रिक सहाय्य गटाची स्थापना करणे - मार्गदर्शक सुचनाबाबत.

**संदर्भ :** म.रा.जै.वि.मंडळाचे पत्र क्र. म.रा.जै.वि.मं/कक्ष-३/प्र.क्र.०३/६६९ दिनांक १४/०९/२०१६

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये, महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शसन निर्णय क्र. व्हीपीएम-२६१३/प्रक्र-९७/पं. रां.४, दि. ०२/०५/२०१६ अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे पंचायत राज व्यवस्थेतील प्रत्येक स्थानिक संस्थेने जैविक विविधता व्यवस्थापन समितीची स्थापना करणे संबंधात सविस्तर मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. या शिवाय सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.७ अन्वये जिल्हा परिषद स्तरावर स्थापीत करावयाच्या तांत्रिक सहाय्य गटाच्या स्थापनेबाबतच्या मार्गदर्शक सुचना पाठविण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

वरील बाबीस अनुसरून मंडळाने लोक जैविक विविधता नोंदवही तयार करतांना लागणाऱ्या आवश्यक तांत्रिक सहाय्याचा अनुभव विचारात घेवून जिल्हा परिषद स्तरावर तांत्रिक सहाय्य गटाच्या स्थापनेबाबतच्या मार्गदर्शक सुचना तयार केलेल्या आहेत. प्रत सहपत्रीत आहे.

सबब सदर मार्गदर्शक सुचनानुसार जिल्हा परिषद स्तरीय तांत्रिक सहाय्य गटाची स्थापना करण्याची कार्यवाही करण्यात यावी व तांत्रिक सहाय्य गट स्थापन केल्याबाबतचा अहवाल मंडळास पाठवावा ही विनंती.

**सहपत्र :** वरील प्रमाणे

**(डॉ. पी. एन. मुंडे)**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक**
**तथा सदस्य सचिव**
**महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर** ६/१०

**माहीतीकरीता :**

प्रतिलीपी : प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन-२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१
प्रतिलपी : सचिव (वने), महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
प्रतिलीपी : जिल्हाधिकारी (सर्व)
प्रतिलीपी : उपवनसंरक्षक तथा समन्वय सदस्य जिल्हास्तरीय जैविक विविधता व्यवस्थापन समिती (सर्व)
प्रतिंलीपी : डॉ. राहुल मुंगीकर, वरिष्ठ संशोधक समंत्रक, मराजैविमं, उपकार्यालय, पुणे.

# महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर

## जिल्हा स्तरीय तांत्रिक सहाय्य गटाची स्थापना करणे

## मार्गदर्शक सुचना (ग्रामीण भागाकरीता)

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. व्हीपीएम-२६१३/प्र.क्र.९७/पं.रा.४, दि. ०२ मे, २०१६ अन्वये निर्देशित केल्यानुसार जैविक विविधता कायदा २००२ चे कलम ४१(१) व महाराष्ट्र जैविक विविधता नियम २००८ चे नियम २३(२) मधील तरतुदींनुसार पंचायत राज व्यवस्थेतील प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने जैविक विविधता व्यवस्थापन समितीची स्थापना करणे बंधनकारक आहे. याबाबत सदर शासन निर्णयात स्वराज्य संस्था स्तरावरील जैविक विविधता व्यवस्थापन समित्या स्थापनेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाकडून या अनुषंगाने विहित नमुना प्रपत्र पाठवून राज्यातील सर्व स्वराज्य संस्था स्तरावरील जैविक विविधता व्यवस्थापन समित्या स्थापनेबाबत जरूर ते मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

उपरोक्त दि. ०२/०५/२०१६ चे शासन निर्णयामधील मुद्दा क्र. ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषद तथा पंचायत समिती स्तरावर गठीत होणाऱ्या जैविक विविधता व्यवस्थापन समित्यांनी जिल्ह्यात ग्रामिण क्षेत्रात जैविक विविधता व्यवस्थापन समित्या व लोक जैविक विविधता नोंदवही तयार करण्यासाठी समन्वयकाची भूमिका बजावेल. शिवाय ह्या कामी गठीत करण्यात आलेल्या जिल्हा तांत्रिक सहाय्य गटाच्या मदतीने ग्राम पंचायत स्तरीय समित्यांना जरूर ती मदत करेल.

वरील बाबींस अनुसरून वरील शासन निर्णयातील मुद्दा क्र.७ मधे नमूद केल्याप्रमाणे समुचीत स्तरावरील जैविक विविधता व्यवस्थापन समित्यांना वेळोवेळी तांत्रिक सहाय्य करण्यासाठीजिल्हा परिषदेकडून शासकीय अभिकरणे, अशासकीय संघटना, शिक्षण क्षेत्र, समाज व व्यक्ती यामधील जैविक विविधता क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेल्या तांत्रिक सहाय्य गटाची स्थापना करणे अनिवार्य आहे. या दृष्टिने महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाने पत्र क्र. मराजैविमं/कक्ष-३/ प्र.क्र.०३/६६९ दि.१४/९/२०१६ नुसार जिल्हा स्तरीय तांत्रिक सहाय्य गटाची स्थापना करणेबाबतच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शन सूचना पाठविण्यात येणार असल्याचे कळविले आहे. यास अनुसरून खालीलप्रमाणे जिल्हा स्तरीय तांत्रिक सहाय्य गटाची स्थापना करण्याची कार्यपध्दती बाबत मार्गदर्शक सूचना मंडळाने निश्चित केलेली आहे.

**१. तांत्रिक सहाय्य गटाची रचना**

**२. तांत्रिक सहाय्य गटाच्या निवडीची कार्यपध्दती**

**३. तांत्रिक सहाय्य गटाचे भूमिका व कार्ये**

**४. तांत्रिक सहाय्य गटाच्या खर्चाचे नियोजन**